ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 15 फेब्रुवारी 2026 | | अंक क्र. 269 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय ॐ नमः शिवाय

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

## महाशिवरात्र विशेष

# पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र वैद्यनाथ मंदिर

**परळी (महाशिवरात्र विशेष बातमीपत्र) :**

**भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी पंचम ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाणारे परळी येथील वैद्यनाथ मंदिर महाशिवरात्र निमित्त भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले आहे. 'जागृत' देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनासाठी देशभरासह परदेशीही नागरिक दर्शनासाठी येत असतात. महाशिवरात्र पर्वानिमित्त पंचम ज्योतिर्लिंग असलेले वैद्यनाथ मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवायला मिळत आहे. पहाटेपासूनच हर हर महादेवच्या जयघोषात मंदिर परिसर दुमदुमून जात असतो लाखो भाविक दर्शनासाठी दाखल झाले आहेत.**

## ऐतिहासिक परंपरा व स्थापत्य परंपरा

इतिहासाच्या पानांवर नजर टाकली असता, देवगिरीच्या यादवांच्या काळात मंदिराची उभारणी झाल्याचे मानले जाते. यादवकालीन प्रधान हेमाद्री पंडित यांनी हे मंदिर बांधल्याची परंपरा सांगितली जाते. पुढे पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचा जीर्णोद्धार करून त्याचे वैभव टिकवून ठेवले.

हे मंदिर हेमाडपंथी स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. चिरेबंदी बांधकाम, मजबूत तटबंदी, भव्य प्रवेशद्वार आणि लांबलचक पायऱ्या ही मंदिराची वैशिष्ट्ये आहेत. येथे भक्तांना शिवलिंगास स्पर्श करून दर्शन घेण्याची परंपरा असल्याने भाविकांमध्ये विशेष श्रद्धा आहे.

चिरेबंदी बांधकाम, भव्य प्रवेशद्वार, लांबलचक पायऱ्या आणि एकाच पातळीवर असलेला गाभारा व सभामंडप ही मंदिराची वैशिष्ट्ये आहेत. सभामंडपातून थेट ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेता येते. विशेष म्हणजे येथे भक्तांना शिवलिंगास स्पर्श करून दर्शन घेण्याची परंपरा आहे.

## स्थापत्य वैशिष्ट्ये

मंदिराचा गाभारा आणि सभामंडप एकाच पातळीवर असल्यामुळे सभामंडपातून थेट ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेता येते, हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. इतर अनेक ज्योतिर्लिंगांप्रमाणे उंच गाभारा नसून येथे दर्शन अधिक सुलभ आहे. विशेष म्हणजे येथे भक्तांना शिवलिंगास स्पर्श करून दर्शन घेण्याची परंपरा आहे, ज्यामुळे भाविकांना अधिक आध्यात्मिक समाधान मिळते.

## कडेकोट बंदोबस्त व सुविधा

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. स्वतंत्र दर्शन रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय पथके, स्वयंसेवक आणि सीसीटीव्हीद्वारे देखरेख अशी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून वाहतूक व्यवस्थाही सुरळीत ठेवण्यात आली आहे. महाशिवरात्र पर्वामुळे परळी नगरीत आध्यात्मिक ऊर्जा आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रभू वैद्यनाथांच्या चरणी नतमस्तक होत असतात.






## पवित्र सरस्वती गंगा आणि पौराणिक संदर्भ

मंदिर परिसरातून वाहणारी प्राचीन सरस्वती गंगा (लेंडी) नदी पौराणिक महत्त्वाची मानली जाते. ब्रह्मगंगा, वेणूमती आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम परळी जवळच होत असल्याने त्या भागाला 'संगम' असेही नाव पडले असावे.

पुराणकथेनुसार, एकदा सरस्वतीला आलेल्या प्रचंड पुरामुळे मंदिर धोक्यात आले असता गणेशमूर्तीने वैद्यनाथाला साद घातल्याची कथा सांगितली जाते. मंदिराच्या तटबंदीवरील उजवा हात तोंडावर ठेवलेली गणेशमूर्ती याची साक्ष देते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

कालांतराने नदीपात्रावर अतिक्रमणे झाल्याने सरस्वती नदीची रुंदी कमी झाली आहे. नदीचे रुंदीकरण व पुनर्जीवन व्हावे यासाठी स्थानिक पातळीवर पाठपुरावा सुरु असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## तालुक्यातील ऐतिहासिक वारसा ; श्री पापदंडेश्वर मंदिर, गाढे पिंपळगाव

परळी तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे 12 व्या शतकातील हेमाडपंथी स्थापत्यशैलीतील श्री पापदंडेश्वर मंदिर आजही इतिहासाची साक्ष देत उभे आहे. यादवकालीन शिवमंदिरांपैकी हे एक महत्त्वाचे स्थान मानले जाते. प्रवेशद्वारावरील भलीमोठी दगडी शिळा हे मंदिराचे वैशिष्ट्य आहे. पूर्वी भक्तांना दंडवत घालून शिळेखालून प्रवेश करावा लागत असल्याने 'पापदंडेश्वर' हे नाव प्रचलित झाल्याची आख्यायिका आहे.

दरवर्षी चैत्र महिन्यात सप्ताह, पालखी सोहळा आणि श्रावणात मोठ्या प्रमाणावर शिवभक्तांची उपस्थिती असते. लोकसहभागातून मंदिर सभामंडपाचे सुशोभीकरण करण्यात आले असून या मंदिराचा तिर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## बंदोबस्त व्यवस्था आणि भक्तांची मांदियाळी

यंदा महाशिवरात्र पर्वासोबतच राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन महा एक्स्पोचे आयोजन करण्यात आल्याने भाविक व नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासन यंत्रणा सतर्क झाली असून मंदिर परिसर, शहरातील प्रमुख मार्ग आणि एक्स्पो स्थळी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आहे.



# कौटुंबिक जीवन, श्रद्धा आणि महाशिवरात्रीचे व्रत : स्त्रीच्या भावविश्वाचा वेध

**महाशिवरात्री हा सण केवळ धार्मिक विधी किंवा उपासनेपुरता मर्यादित नाही, तर तो भारतीय समाजाच्या कौटुंबिक रचनेशी, भावनिक नातेसंबंधांशी आणि सांस्कृतिक मूल्यांशी खोलवर जोडलेला आहे. विशेषतः काही परंपरांमध्ये विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि अविवाहित मुली योग्य जोडीदार मिळावा म्हणून व्रत करतात, ही परंपरा भारतीय समाजातील श्रद्धा, आशा आणि नात्यांवरील विश्वासाचे सुंदर प्रतिबिंब आहे. शिव-पार्वतीचे आदर्श वैवाहिक जीवन हे या श्रद्धेचे प्रेरणास्थान मानले जाते आणि त्यामुळे महाशिवरात्रीला कौटुंबिक व सामाजिक आयुष्यात विशेष स्थान प्राप्त झाले आहे.**



भारतीय संस्कृतीत विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा करार नसून दोन कुटुंबांचे, दोन परंपरांचे आणि दोन जीवनप्रवाहांचे मिलन मानले जाते. या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे व्रत हे केवळ धार्मिक कृत्य नसून नात्यांबद्दलची जबाबदारी, प्रेम आणि समर्पण व्यक्त करण्याचे माध्यम आहे. विवाहित स्त्री जेव्हा पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत करते, तेव्हा ती आपल्या संसाराच्या स्थैर्यासाठी प्रार्थना करत असते. तिच्या मनात कुटुंबाच्या सुरक्षिततेची आणि आनंदाची भावना असते.

शिव आणि पार्वती यांचे नाते भारतीय मानसात आदर्श दांपत्य म्हणून चित्रित केले गेले आहे. शिवाचा विरक्त स्वभाव आणि पार्वतीचे संयम, प्रेम व धैर्य यांचा सुंदर समतोल हा दांपत्य जीवनातील समजूतदारपणाचे प्रतीक मानला जातो. या कथांमधून असा संदेश दिला जातो की वैवाहिक जीवनात परस्पर सन्मान, सहनशीलता आणि विश्वास अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे महाशिवरात्रीचे व्रत हे केवळ फलप्राप्तीसाठी नसून या मूल्यांची आठवण करून देणारे आहे.

अविवाहित मुलींसाठीही महाशिवरात्री विशेष महत्त्वाची मानली जाते. योग्य जीवनसाथी मिळावा, समजूतदार आणि आधार देणारा जोडीदार लाभावा, अशी प्रार्थना त्या करतात. ही परंपरा समाजातील विवाहसंस्थेवरील विश्वास दर्शवते. त्याचबरोबर ती मुलींना संयम, आशावाद आणि सकारात्मक विचारांची प्रेरणा देते.

कौटुंबिक जीवनात श्रद्धा महत्त्वाची भूमिका बजावते. व्रत, पूजा आणि धार्मिक विधी हे कुटुंबातील सदस्यांना एकत्र आणतात. महाशिवरात्रीच्या दिवशी अनेक कुटुंबे एकत्र मंदिरात जातात, पूजा करतात आणि भजन-कीर्तनात सहभागी होतात. या सामूहिक अनुभवामुळे कुटुंबातील भावनिक बंध अधिक दृढ होतात. मुलांमध्येही परंपरेबद्दल आदर निर्माण होतो.

सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले तर अशा व्रतपरंपरा समाजात मूल्यसंस्कार टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. त्यातून कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या बदलत्या काळात, जेव्हा जीवनशैली वेगाने बदलत आहे आणि व्यक्तिवाद वाढत आहे, तेव्हा अशा परंपरा लोकांना नात्यांची जाणीव करून देतात. त्या आपल्याला स्मरण करून देतात की जीवन केवळ वैयक्तिक यशापुरते मर्यादित नसून परस्परांच्या सुखदुःखात सहभागी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

तथापि, या परंपरेचा अर्थ समजून घेणेही आवश्यक आहे. व्रताचा खरा उद्देश केवळ विधीपूर्ती नसून अंतर्मनातील सकारात्मक भावना जागृत करणे हा आहे. प्रेम, विश्वास आणि परस्पर आदर या मूल्यांशिवाय कोणतेही नाते टिकू शकत नाही. त्यामुळे महाशिवरात्रीच्या निमित्ताने नात्यांवर पुनर्विचार करण्याची आणि त्यांना अधिक समृद्ध करण्याची संधी मिळते.

आधुनिक समाजात स्त्रियांची भूमिका मोठ्या प्रमाणावर बदलत आहे. शिक्षण, करिअर आणि सामाजिक सहभागामुळे त्यांची ओळख अधिक व्यापक झाली आहे. अशा परिस्थितीत व्रतपरंपरा नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे — ती स्त्रीच्या शक्तीचे, तिच्या भावनिक सामर्थ्याचे आणि कुटुंब घडवण्याच्या क्षमतेचे प्रतीक म्हणून समजली जाऊ शकते. अनेक स्त्रिया आज व्रत करताना समानतेचा आणि परस्पर सहकार्याचा संदेशही देतात.

महाशिवरात्रीच्या दिवशी केलेली प्रार्थना ही केवळ वैयक्तिक इच्छांसाठी नसून कुटुंबाच्या कल्याणासाठी असते. या दिवशी लोक आपल्या जीवनातील नात्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. क्षमा, समजूतदारपणा आणि संवाद यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होते. त्यामुळे हा सण कुटुंबातील सौहार्द वाढवण्याचे माध्यम ठरतो.

मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर व्रत आणि पूजा यामुळे मनाला स्थैर्य मिळते. श्रद्धेमुळे सकारात्मक विचार वाढतात आणि भविष्याबद्दल आशावाद निर्माण होतो. जेव्हा एखादी व्यक्ती प्रार्थना करते, तेव्हा ती आपल्या मनातील चिंता आणि अपेक्षा व्यक्त करते, ज्यामुळे मानसिक हलकेपणा जाणवतो. त्यामुळे महाशिवरात्रीचा अनुभव भावनिकदृष्ट्या समृद्ध करणारा ठरतो.

शेवटी, महाशिवरात्रीचे व्रत ही परंपरा आपल्याला सांगते की नात्यांची जपणूक ही सततची साधना आहे. शिव-पार्वतीच्या कथांमधून प्रेरणा घेत, प्रेम, संयम आणि परस्पर सन्मान यांचा मार्ग स्वीकारणे हेच या व्रताचे खरे तत्त्व आहे. कौटुंबिक सुख, सामाजिक समन्वय आणि आध्यात्मिक उन्नती यांचा संगम घडवणारा हा सण भारतीय संस्कृतीतील नातेसंबंधांच्या पवित्रतेची जाणीव करून देतो.

अशा प्रकारे विवाहित स्त्रियांचे आणि अविवाहित मुलींचे व्रत हे केवळ परंपरा नसून जीवनातील नात्यांवरील विश्वास, आशा आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहे. महाशिवरात्री आपल्याला शिकवते की श्रद्धा आणि प्रेम यांच्या आधारेच मजबूत कुटुंब आणि सुदृढ समाज उभा राहू शकतो.

**- डॉ सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र राज्य**

# सौरपंपाची केबल चोरणारी टोळी सक्रिय; शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान

## वाहिरा येथील शेतकऱ्यांच्या सौर पंपाच्या केबलची चोरी

**प्रतिनिधी – सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील शेतकरी बापू लक्ष्मन पगारे, व बाळू हागरे, अंच्या शेतातील सौर ऊर्जापंप असलेल्या पंपाची केबल चोरीला गेली आहे, तसेच बापू लक्षुमन पगारे, यांची १००,फूट केबल तर बाळू हागरे, यांच्या पंपाची २२५ फूट केबल चोरीला गेल्याची घटना दि. १३ रोजी घडली आहे.

केबल) चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ लागले आहे.



केबल चोरी गेल्या मुळे शेतकऱ्याला पिकाला पाणी देण्या साठी अडचणी येऊ लागल्या आहेत.

अगोदरच शेतीमालाला भाव नाही, उत्पादन खर्च निघणेही अवघड झाले आहे. अतिवृष्टीमुळे तर शेतकरी पुरता कोलमडला आहे. सुरळीत वीजपुरवठा नसल्याने पिकांना पाणी देणे जिकिरीचे जाते. अशा परिस्थितीत सोलर पंपाची केबल चोरीच्या घटनेने शेतकरी हतबल झालेला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार देखील दिली आहे. परत दुसऱ्या शेतकऱ्याची घटना घडन्या आधी प्रशासनाने दाखल घेऊ लवकरात लवकर या चोरट्याच्या मुसक्या आवळाव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी आहे

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवात उल्लेखनीय यश

**परळी/प्रतिनिधी**

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी बीडच्या कलाक्षेत्राला वाव देणाऱ्या सलग चौथ्या वर्षी संपन्न झालेल्या अनिलदादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत नवा विक्रम प्रस्थापित केला.बीड जिल्ह्यातील गेवराई, परळी, अंबाजोगाई, केज, माजलगाव, बीड, आष्टी, पाटोदा या तालुक्यांमधून, विविध ग्रामीण भागातील गाव खेड्यातून २९६ शाळांतील तब्बल १९ हजार ५७० बालकलाकारांनी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला व रांगोळी या विविध कला प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या भव्य दिव्य महोत्सवात दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.




सदरील स्पर्धेमध्ये शाळेतील इयत्ता पहिली ते तिसरी व चौथी ते सहावी गटातील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय समूहगायन स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावरती नेत्रदीपक कामगिरी करत प्रथम पारितोषिके मिळविली.चौथी ते सहावी वयोगटातील जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला तसेच जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेमध्ये इयत्ता सातवीचा विद्यार्थी चि. राघव गिरवलकर याने प्रथम क्रमांक मिळविला.शाळेतील कलाशिक्षक श्री.प्रसाद देशपांडे यांचा सर्वोत्कृष्ट कलाशिक्षक म्हणून स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सदरील यशस्वी विद्यार्थ्यांना वरिष्ठ समन्वयक श्री.सुनील येवले सर,श्री.गणेश कांबळे सर, श्री. प्रसाद देशपांडे सर व सौ.एलीग्रीना येवले मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री. किरण गित्ते सर (सचिव,त्रिपुरा सरकार) यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे प्राचार्य मा.श्री श्रीकांत पाटील सर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे स्मृतिचिन्ह देऊन त्यांना सन्मानित केले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

# परळीत संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष सोहळ्याचे आयोजन

## प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, सहाय्यक आयुक्त मा. विशालजी लोंढे, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांची उपस्थिती लाभणार

**परळी (प्रतिनिधी)**

संत परंपरेतील समाजप्रबोधनाची अखंड ज्योत असलेल्या संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परळी यांच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य कार्यक्रम सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता लोकनेते गोपीनाथ मुंडे नटराज रंगमंदिर येथे संपन्न होणार आहे. परळी परिसरातील सर्व अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी या प्रेरणादायी सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक तथा संस्थेचे सचिव पृथ्वी शिंदे यांनी केले आहे

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तथा ८९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन (२०१६) चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस हे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून समाज कल्याण विभाग, पुणे येथील सहाय्यक आयुक्त मा. विशालजी लोंढे उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून देवाची आळंदी येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांची उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळ्यात “फुले, शाहू, आंबेडकर आणि गाडगेबाबा यांच्यातील संवादी समता आणि परिवर्तनवादी विचार” या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या विचारांतील समान धागे, सामाजिक समता, शिक्षण, स्वच्छता व परिवर्तनाची दिशा यावर सखोल चिंतन करण्यात येणार आहे.

याच वेळी प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार असून, सामाजिक कार्यात अग्रक्रमी योगदान देणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय ‘राष्ट्रसंत गाडगेबाबा समाजरत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सांगता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांच्या समाजप्रबोधनपर कीर्तनाने होणार असून, कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचा संदेश दिला जाणार आहे.

मानवतावादी विचारधारेचे परळी परिसरातील सर्व अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी या प्रेरणादायी सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक तथा संस्थेचे सचिव पृथ्वी शिंदे यांनी केले आहे.







दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं ; पशुसंवर्धनातून मोठी रोजगार निर्मिती करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महा पशुधन एक्सोचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पंकजाताई मुंडे यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक



**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं आहे. आपल्या संस्कृतीमध्ये जे काही चक्र आहे ते सर्व पर्यावरण पूरक आणि नैसर्गिक साखळीला अनुसरूनच आहे. पशुसंवर्धना च्या माध्यमातून येणाऱ्या काळात मराठवाडा विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात नवनवीन प्रयोग, अनुसंधान साधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी प्रभावीपणे काम सुरू केले असून पशुसंवर्धनातून रोजगार निर्मितीसाठी पशुसंवर्धन विभागाच्या सर्व प्रस्तावित नवनवीन योजनांना भरघोस निधी दिला जाईल अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैजनाथ येथील महा पशुधन एक्सपो च्या समारंभात दिली. तर भारतात पशुपालनाला कृषीचा दर्जा देणारे, अतिशय जबाबदार मुख्यमंत्री आपल्याला लाभले असून येणाऱ्या काळात पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून नवउद्योजक तयार करण्यासाठी मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबविणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली.

पशूसंवर्धन विभागाच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून कालपासून सुरू झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील महा पशुधन एक्सपोचा मुख्य समारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. एक्सपो मधील विविध स्टॉल्सना भेट देत मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली. व्यासपीठावर ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, आ. रत्नाकर गुट्टे, माजी आमदार बदामराव पंडित,माजी आमदार गोविंद केंद्रे, संजय दौंड, परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी , गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार , गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा,अक्षय मुंदडा पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, प्रवीण कुमार देवरे डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आदींसह नेतेगण, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांनी केले पंकजाताईंचे भरभरून कौतुक**



यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी चांगले व प्रभावी काम सुरू केले आहे. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी राज्य सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी राहणार आहे. आपलं नातं हे माय आणि मातीशी घट्ट असून त्या दृष्टीने काम करण्याचा आपल्या सरकारचा संकल्प आहे. आपल्या संस्कृतीनेच आपल्याला निसर्ग, माती, पशु, वनस्पती यांच्याशी जोडलेले आहे. त्यामुळे आपल्या प्रत्येक देवते सोबत पशु आणि वनस्पती यांचे अवतार आपल्याला बघायला मिळतात. आजच्या आधुनिक काळामध्ये माय आणि माती यांच्याशी तुटत चाललेली नाळ सांगड घालून पुन्हा जोडण्याच्या दृष्टिकोनातून पशु संवर्धनाचा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. या माध्यमातून शेतकरी समृद्ध, संपन्न होणार आहे. मराठवाडा ,विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रामध्ये पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रस्तावित करण्यात आलेल्या सर्व योजनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यासाठी आवश्यक भरघोस निधीची तरतूद आपले सरकार निश्चित करणार आहे. नैसर्गिक शेती, पशुसंवर्धन त्यातून रोजगार निर्मिती नवनवीन संशोधन, वेगवेगळ्या दुग्ध वाढीच्या उपक्रम सरकार प्रभावीपणे राबवणार आहे. येणाऱ्या काळात वैरण विकास हा कार्यक्रम आपल्याला हातात घ्यायचा आहे. यासाठी पंकजाताई मुंडे प्रभावीपणे निश्चित काम करतील अशी आपल्याला खात्री असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पंकजाताई मुंडे यांनी महा पशुधन एक्सपो अतिशय सुरेख व सुंदर आयोजित केला. या महा एक्स्पोच्या माध्यमातून नवनवीन प्रयोग, पशुपालन विषयक नवीन माहिती विविध जातीवंत पशुपालनाच्या संकल्पना या प्रत्येकाने समजून घेतल्या पाहिजेत. यातूनच खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

**पशुसंवर्धनातून ग्रामीण अर्थकारणाला गती ना.पंकजाताई मुंडे**

यावेळी बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना असो किंवा जलस्वराज्य योजना असो या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव ग्रामीण महाराष्ट्रात कोरले गेले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातूनही आपल्याला प्रभावीपणे काम करून दाखवायचे आहे.

## पशुसंवर्धन विभागाच्या सर्व प्रस्तावित योजनांना भरघोस निधी देण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबवणार : ना पंकजाताई मुंडे

# महाशिवरात्री निमित्त परळीत 'ड्राय डे' जाहीर; प्रशासनाने दारु विक्रीवर बंदी लागू केली

### शिवकुमार केदारी यांच्या निवेदनाची दखल; जिल्हाधिकारी व उत्पादन शुल्क विभागाकडून आदेश

**परळी वैजनाथ (वार्ताहर)**

परळी वैजनाथ हे भारतातील 12 ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र ज्योतिर्लिंग असून, महाशिवरात्रीच्या पर्वणीला येथे लाखो शिवभक्त दर्शनासाठी येतात. या पार्श्वभूमीवर परळी शहरात धार्मिक पवित्रता, कायदा-सुव्यवस्था व शांतता अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने महाशिवरात्रीच्या दिवशी दारू विक्री पूर्णतः बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दि. 15/02/2026 रोजी महाशिवरात्री निमित्त मा. कलेक्टर साहेबांच्या आदेशानुसार 'ड्राय डे' (कोरडा दिवस) जाहीर करण्यात आला असून, सदर दिवशी परळी शहरात सर्व प्रकारच्या मद्यविक्रीच्या अनुज्ञप्ती बंद राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम 1949 व त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. हा आदेश मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग बीड यांच्या निर्देशानुसार जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, महाशिवरात्री व आगामी महापशुधन एक्स्पो-2026 (अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन) या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर परळी शहरात मांस विक्री व मद्यविक्रीवर बंदी घालावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी



(हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी केली होती. त्यांनी याबाबत ईमेलद्वारे निवेदन सादर करून मा. जिल्हाधिकारी साहेब बीड, मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय श्रीमती सुनेत्राताई अजित पवार, मा. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, मा. आमदार धनंजय मुंडे, मा. पोलीस अधीक्षक बीड तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली होती. या निवेदनात नमूद करण्यात आले होते की, या कालावधीत देशभरातून पशुपालन क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, पशुपालक, शेतकरी, नागरिक तसेच लाखो शिवभक्त परळी वैजनाथ येथे दाखल होणार आहेत. अशा वेळी शहरात मद्यविक्री सुरू राहिल्यास भाविकांच्या धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता असून सामाजिक शांतता भंग पावण्याचा तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. विशेष म्हणजे परळी शहरापासून अवघ्या 5 कि.मी. अंतरावर असलेले श्री सोमेश्वर महाराज जागृत देवस्थान हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, अनेक वर्षांपासून श्री सोमेश्वर महाराजांची पालखी परळी शहरात येत असते. त्यामुळे महाशिवरात्रीच्या काळात संपूर्ण परिसर भक्तिमय व धार्मिक वातावरणाने भारावून जातो. अशा पवित्र वातावरणात मद्यविक्री सुरू राहणे अनुचित असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने दखल घेत महाशिवरात्रीच्या दिवशी 'ड्राय डे' लागू केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी श्री. शिवकुमार केदारी यांनी मा. जिल्हाधिकारी साहेब बीड व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांचे आभार मानले. तसेच शहरातील संपादक, पत्रकार बांधवांनी पेपर व ऑनलाईन माध्यमातून आवाज उठविल्याबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. "श्री वैद्यनाथ प्रभु व श्री सोमेश्वर भगवान सर्वांची मनोकामना पूर्ण करो" अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस कोर्सच्या माध्यमातून उद्योग सुरु करावेत- राऊत




**आष्टी प्रतिनिधी :**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कृषी मंत्रालय भारत सरकारच्या अंतर्गत मॅनेज हैदराबाद आणि नाबार्डच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस या कोर्सच्या माध्यमातून ग्रामीण भागात शेतीशी निगडित उद्योग सुरू करावेत असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा आष्टीचे माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत यांनी जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान आष्टी येथे ॲग्री क्लीनिक ॲग्री बिजनेसच्या तेराव्या बॅच च्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले ते पुढे बोलताना म्हणाले की कुठलाही व्यवसाय करत असताना जिद्द आणि चिकाटी महत्त्वाचे आहे.

हा व्यवसाय लहान आणि तो व्यवसाय मोठे असे करून चालणार नाही अनेक छोटे व्यवसाय सुरू करून कित्येकांनी ते राज्यात नाही तर देशात नावारूपाला आणले आहेत.

या कार्यक्रमास नोडल ऑफिसर तथा कृषीचे माजी उपसंचालक विठ्ठलराव गुंजाळ संस्थेचे अध्यक्ष तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे नियोजन ॲग्री क्लीनिक ॲग्री बिझनेस से समन्वयक सिताराम पोकळे व विद्या पोकळे यांनी केले होते

# ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिपमध्ये माऊंट लिटरा झी स्कूलच्या क्रीडा शिक्षिका वैष्णवी जिगे यांचे यश

**परळी / प्रतिनिधी**

मुंबई स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या वतीने पवई येथे आयोजित करण्यात आलेल्या ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथील क्रीडा शिक्षिका वैष्णवी जिगे यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

राज्यस्तरीय या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी आपले कराटे कौशल्य सिद्ध केले. काता व कुमिते प्रकारात दमदार प्रदर्शन करून त्यांनी पदक पटकावले आणि आपल्या शाळेचा व शहराचा नावलौकिक वाढविला. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, शाळेचे उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे सर व प्राचार्य मंगेश काशीद सर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस



शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनीही त्यांचे कौतुक केले. माऊंट लिटरा झी स्कूलसाठी ही अभिमानाची बाब असून त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्येही क्रीडाप्रेम व प्रेरणा निर्माण झाली आहे. भविष्यातही राज्य व राष्ट्रीय स्तरावर त्या अधिक यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आष्टी येथील वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाची स्थापना ही न्यायव्यवस्था वेगवान सुलभ आणि बळकट होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा

### न्यायमूर्ती किशोर चंद्रकांत संत यांचे प्रतिपादन

**आष्टी(प्रतिनिधी)**- आष्टी येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय येथे स्थापन झाल्याने न्याय प्रक्रिया वेगवान होऊन सुलभ होणार आहे त्यामुळे न्यायव्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल आहे असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती किशोर चंद्रकांत संत यांनी केले आष्टी येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालयाचा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी दृकश्राव्य माध्यमातून त्यांचे समवेत प्रमुख अतिथी म्हणून माननीय न्यायमूर्ती श्री रविंद्र मधुसूदन जोशी हे उपस्थित होते तर बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय श्री आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांच्या उपस्थितीमध्ये वरिष्ठ तर न्यायालयाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य वसंत सोळंके अहमद पठाण तसेच आष्टीच्या वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाच्या प्रथम महिला न्यायाधीश श्रीमती ए बी निवारे हे उपस्थित होते तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार साहेबराव दरेकर आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे महबूब शेख



सतीश शिंदे नगराध्यक्ष जिया बेग उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे यांचे सह विविध ठिकाणाहून आलेले अनेक मान्यवर वकील उपस्थित होते सुरुवातीस आष्टी वकील संघाचे अध्यक्ष सय्यद ताहेर जमाल यांनी प्रास्ताविक केले पुढे बोलताना न्यायमूर्ती किशोर संत म्हणाले की आष्टी येथे वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन होणे हा ऐतिहासिक क्षण असून वादाचे निराकरण होण्यासाठी यापुढे प्रवास आणि वेळ तसेच पैशाचा अपव्यय वाचणार न्याय प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. या न्यायालयाच्या स्थापनेमुळे आष्टीने न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण झेप घेतली असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले की आष्टी येथील न्यायालयाचा इतिहास हा शंभर वर्षाचा असून न्यायदानाचे मोठे सामर्थ्य आष्टी येथील वकील संघामध्ये आहे आष्टी येथील भूमिपुत्र प्रभाकर देशमुख त्यांचे सुपुत्र माननीय न्यायमूर्ती सुनील देशमुख माननीय न्यायमूर्ती संतोष बोरा यांनी उच्च न्यायालयामध्ये काम केले आहे वकिलांनी पक्षकारांसाठी तन मन लावून काम करावे आपल्या आपल्या पदाची प्रतिष्ठा जपावी रस्त्यावर उभा राहून काम करणारा वकील आत बसलेल्या वकिलांना प्रतिष्ठा मिळवून देतो त्याच तसा चांगला नसलेला वकील हा चांगल्या वकिलाची सुद्धा अप्रतिष्ठा करत असतो हे लक्षात घेऊन अपप्रवृत्तींकडे दुर्लक्ष करणे बंद करा सज्जन माणूस त्यामुळे बाजूला जाऊ शकतो हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे वकिलांनी प्रतिष्ठान निर्माण करावी त्यामुळे न्यायालयाची प्रतिष्ठा वाढत असते आणि वकिली व्यवसायाची देखील प्रतिष्ठा वाढत असते आजही सर्वसामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे.